महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

**क्र. मु.अ.(वा)/लेखा/ग्रा.पं.दिवाबत्ती/५५/२०१०-११/No 10028 दिनांक : 30 MAR 2011**

## परिपत्रक क्र. १४०

**विषय :-** ग्रामपंचायतीना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांच्या वीज बिलांची रक्कम देण्यासाठी सन २०१०-११ या आर्थिक वर्षासाठी अनुदानापोटी मंजुर केलेली रक्कम रु. ५९,६०,००,०००/- (रुपये एकोणसाठ कोटी साठ लाख फक्त)

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०९/प्र.क्र.-८२/पंरा-४ दि. ३०.०४.२०१०.
२) शासन निर्णय शुध्दीपत्रक दि.२४.५.२०१०
३) शासन निर्णय क्र. बीजीटी-२६०९/प्र.क्र.-८२/पंरा-४ दि.१२.११.२०१०.
४) शासन निर्णय क्र. बीजीटी/२६१०/प्र.क्र.८२/पंरा-४/(२२) दि.५.३.२०११.

---------------------------

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यावरील दिवाबत्तीची विज देयके भागविण्यासाठी शासन ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देते. सन २०१०-११ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये ११९,२०,००,०००/- (रुपये एकशे एकोणीस कोटी वीस लाख फक्त) इतकी तरतुद शासकीय अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे, त्यापैकी रक्कम रुपये ५९,६०,००,०००/- (रुपये एकोणसाठ कोटी साठ लाख फक्त) संदर्भाधीन १, २ व ३ या निर्णयाव्दारे देण्यात आले आहे. आता उर्वरित रकमेपैकी रु. ५९,६०,००,०००/- (रुपये एकोणसाठ कोटी साठ लाख फक्त) वरील संदर्भिय क्र.४ या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला रोखीत प्राप्त झाले आहेत.

शासन निर्णयासोबत जोडलेल्या जिल्हा निहाय विवरण पत्रातील रक्कमेचे, सबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या नावाने थकबाकीच्या प्रमाणात वर्ग करण्याबाबत संबंधितांनी जरुर ती कार्यवाही करावी.

थकबाकी पोटी समायोजित करण्यात आलेल्या रक्कमेचे (सन २०१०-११) ग्रामपंचायत निहाय विवरण पत्राची एक प्रत संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच विभागीय आयुक्त व उपसचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्यासह या कार्यालयास त्वरित पाठवावी.

**सोबत :** वरीलप्रमाणे

(सही) १८/०३
**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादर :-**
संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, प्रकाशगड, बांद्रा (पू), मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :-**
१. सर्व मुख्य अभियंते, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, संवसु परिमंडळ कार्यालये, माहिती व उचित कार्यवाहसाठी
२. मुख्य महाव्यवस्थापक (निगम वित्त), म.रा.वि.वि.कं. मर्यादित, मुंबई.

**प्रत रवाना :**
१. सर्व अधिक्षक अभियंते, संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
२. महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), ३ रा मजला, हॉगकॉंग इमारत, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. सर्व कार्यकारी अभियंते, संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित
४. सर्व उपकार्यकारी अभियंते / सहाय्यक अभियंते, संवसु उपविभागीय कार्यालये,
---- उचित कार्यवाहीसाठी.

D:\Vaze\Account\circular streetlight.doc 14.3.2011.doc

अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१०-२०११
३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.
२०० इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतीना १०० % अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत)(मागणी क्र. एल -५)

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. बीजीटी २६१०/प्र.क्र. ८२ /पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दिनांक- ०५ मार्च,२०११.

वाचा :-१) शासन निर्णय , ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २०८५/सीआर १९४०/२२ दि . ३०.१.९०
२) शासन निर्णय , समक्रमांक दि . ३०.४.२०१० व शुध्दीपत्र समक्रमांक दि.२४ मे,२०१०
३) शासन निर्णय , समक्रमांक दि . १२ नोव्हेंबर,२०१०

प्रस्तावना :-

ग्राम पंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांवरील दिवाबत्तीची वीज देयके भागविण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देण्यात येते. यासाठी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात वित्त विभागाने एकूण रुपये ११९,२०,००,०००/- (रुपये एकशे ऐकोणवीस कोटी वीस लक्ष फक्त ) इतक्या रकमेची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची दिवाबत्तीची देयके त्वरित भागविण्यासाठी प्रशासकीय विभागांनी शासकीय अनुदानातून परस्पर सदर रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करावी असा निर्णय शासनाने सन २००३ या वर्षी घेतलेला आहे.

शासन निर्णय :-

सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात सदर अनुदानासाठी रक्कम रुपये ११९,२०,००,०००/- ( रुपये एकशे ऐकोणवीस कोटी वीस लक्ष फक्त ) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यांत आली आहे.

२. सदर तरतूदीतून संदर्भीय शासन निर्णय दिनांक ३०/४/२०१० अन्वये ग्रामपंचायतीमधील रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज देयके अदा करण्यासाठी तरतूद रक्कम रुपये १९,८६,७०,०००/- (रुपये एकोणवीस कोटी शहाऐंशी लाख सत्तर हजार फक्त ) व संदर्भीय शासन निर्णय दिनांक १२ नोव्हेंबर,२०१० अन्वये रुपये ३९,७३,३०,०००/- ( रुपये एकोणचाळीस कोटी ब्याहत्तर लक्ष तीस हजार फक्त) असे एकूण रुपये ५९,६०,००,०००/- (रुपये एकोणसाठ

कोटी साठ लक्ष फक्त ) इतके अनुदान सोबतच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई कडे सुपूर्द करण्यात आले आहे. आता उर्वरित अनुदान ग्रामपंचायतींना रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीजदेयके अदा करण्यासाठी रक्कम रुपये ५९,६०,००,०००/- (रुपये एकोणसाठी कोटी साठ लक्ष फक्त) इतके अनुदान सोबतच्या विवरणपत्रात जिल्हानिहाय दर्शविलेल्या विगतवारीप्रमाणे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मुंबई कडे सुपुर्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ती आता या शासन निर्णयाव्दारे कार्यासन अधिकारी, रोखशाखा, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदरचा निधी अधिदान व लेखा कार्यालय मुंबई येथून आहरित करुन वितरित करण्यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी उपरोक्त मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाचा धनादेश महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांच्या नावाने अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून काढावयाचा आहे. श्री. विकास मोहन राऊत, कार्यासन अधिकारी, रोखशाखा यांच्या सहीने तयार केलेले व श्री. मो. का. भोये, उप सचिव (रोखशाखा ), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखाकार्यालय, मुंबई यांचेकडे सादर करण्यात यावे.

४. या करीता रु. ५९,६०,००,०००/- (रुपये एकोणसाठ कोटी साठ लक्ष फक्त ) इतक्या अनुदानास मंजूरी देण्यात येत आहे. सदर अनुदान खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांना दिलेल्या धनादेशाची रक्कम त्यांनी या शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्रातील रकाना क्र. ३ मधील रक्कम त्या त्या जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत असलेल्या ग्रामपंचायतीच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या वीज देयकाच्या थकबाकीस अधीन राहून समायोजित करावी व तसा अहवाल शासनास सादर करावा .

ब ) समायोजित केलेल्या रक्कमेबाबतचे स्वतंत्र विवरणपत्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबईने ठेवणे आवश्यक असून त्याची एक प्रत त्यांनी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावयाची आहे. तसेच त्याची एक प्रत शासनालाही पाठवावयाची आहे.

क) वरील अटीची पूर्तता होत आहे याची खात्री करुन घेण्यासाठी महालेखापाल, महाराष्ट्र -१ , मुंबई आणि महालेखापाल , महाराष्ट्र -२, नागपूर यांना लेखापरिक्षणाकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांची पुस्तके व लेखा पाहणीचा अधिकार राहील. महालेखापाल यांना त्यांचे काम पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यांनी सर्वतोपरी सहकार्य दिले पाहिजे.

ड ) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यां खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावी. व त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र. ३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

५. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून विशेष कार्य अधिकारी /उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

६. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)५० -इतर खर्च (मागणी क्र. एल ५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनैपचारिक संदर्भ क्र. ६९/व्यय-१५ दिनांक १५/२/२०११ व अनौपचारिक संदर्भ क्र. १७३/११ / अर्थ-१७ दिनांक २३/२/२०११ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( म.सो.खंडारे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती )

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी,

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१ (५ प्रती)

२) व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

ड ) खर्चाचा मेळ घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , मुंबई यां खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावी. व त्याची एक प्रत शासनास पाठवावी.

विभागीय आयुक्तांनी शासन परिपत्रक ग्राम विकास विभाग क्र. आरसीएन१०८९/प्र.क्र. ३०२७/२८, दि. ५.९.९० मधील सूचनेप्रमाणे या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापालांकडे नोंदलेल्या खर्चाबरोबर मेळ घालावा व अहवाल शासनाकडे पाठवावा.

५. उपरोक्त निधीबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून विशेष कार्य अधिकारी /उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग हे राहतील .

६. या शासन निर्णयाव्दारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाएवढा खर्च "३६०४" स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २०० इतर संकीर्ण नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रक्कमा देणे (०१)(०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलाची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान देणे (३६०४०३२५) (दत्तमत)५० -इतर खर्च (मागणी क्र. एल ५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनेपचारिक संदर्भ क्र. ६९/व्यय-१५ दिनांक १५/२/२०११ व अनौपचारिक संदर्भ क्र. १७३/११ / अर्थ-१७ दिनांक २३/२/२०११ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( म.सो.खंडारे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई -४०० ००१ वर नमूद केल्याप्रमाणे तीन प्रतीत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.( ३ प्रती )

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी,

१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित , प्रकाशगड,वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ००५१ (५ प्रती)

२) व्यवस्थापकीय संचालक , महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्रकाशगड अनंत काणेकर मार्ग , वांद्रे ( पूर्व ) मुंबई ४०० ०५१.

# विवरणपत्र

शासन निर्णय क्र. , बीजीटी २६१०/प्र.क्र. ८२ /पंरा-४, दिनांक ५ मार्च, २०११ सोबतचे विवरणपत्र ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे. २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (०१) (०३) रस्त्यावरील विजेच्या दिव्याची वीज बिलांची रक्कम देण्यासाठी ग्राम पंचायतींना १०० %अनुदान (३६०४०३२५) (दत्तमत) ५० इतर खर्च (मागणी क्र. एल -५)

रोखीने ( रु. लाखात )

| अ. क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये पुस्तकी समायोजनाव्दारे वितरित करण्यांत येत असलेले अनुदान (एप्रिल द मे २०१० ) रुपये अंकी ( लाखात ) व अक्षरी. | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ठाणे | १४५.०८ | (रुपये एक कोटी पंचेचाळीस लक्ष ऐंशी हजार फक्त ) |
| २ | रायगड | ३१५.६३ | (रुपये तीन कोटी पंधरा लक्ष त्रसष्ट हजार फक्त ) |
| ३ | रत्नागिरी | १०१.४७ | (रुपये एक कोटी एक लक्ष सत्तेचाळीस हजार फक्त ) |
| ४ | सिंधूदुर्ग | ५२.४२ | (रुपये बावन्न लक्ष बेचारळीस हजार फक्त ) |
| ५ | अहमदनगर | २४६.५० | (रुपये दोन कोटी शेहचाळीस लक्ष पन्नास हजार फक्त ) |
| ६ | धुळे | ६०.७८ | (रुपये साठ लक्ष अठ्ठयाहत्तर हजार फक्त ) |
| ७ | नंदूरबार | ११०.१० | (रुपये एक कोटी दहा लक्ष दहा हजार फक्त ) |
| ८ | जळगांव | ३६७.८२ | (रुपये तीन कोटी सदूसष्ट लक्ष ब्याऐंशी हजार फक्त ) |
| ९ | नाशिक | ३३४.७४ | (रुपये तीन कोटी चौतीस लक्ष चौऱ्याहत्तर हजार फक्त ) |
| १० | कोल्हापूर | ९६.३६ | (रुपये शहान्नव लक्ष छत्तीस हजार फक्त ) |
| ११ | सांगली | १६४.६८ | (रुपये एक कोटी चौसष्ट लक्ष अडूसष्ट हजार फक्त ) |
| १२ | सातारा | १७७.५५ | (रुपये एक कोटी सत्त्याहत्तर लक्ष पंचावन्न हजार फक्त ) |
| १३ | सोलापूर | १७४.४९ | रुपये एक कोटी चौऱ्याहत्तर लक्ष एकोणपन्नास हजार फक्त ) |
| १४ | पुणे | २३५.०५ | (रुपये दोन कोटी पस्तीस लक्ष पाच हजार फक्त ) |
| १५ | औरंगाबाद | ७१.२६ | (रुपये एकाहत्तर लक्ष सव्वीस हजार फक्त ) |
| १६ | जालना | १४८.४३ | (रुपये एक कोटी अठ्ठेचाळीस लक्ष त्रेचाळीस हजार फक्त ) |
| १७ | परभणी | २५२.१५ | (रुपये दोन कोटी बावन्न लक्ष पंधरा हजार फक्त ) |
| १८ | हिंगोली | ८७.७५ | (रुपये सत्यांऐंशी लक्ष पंचाहत्तर हजार फक्त ) |
| १९ | बीड | ३०३.५३ | (रुपये तीन कोटी तीन लक्ष त्र्येपन्न हजार फक्त ) |
| २० | लातूर | ३०३.३२ | (रुपये तीन कोटी तीन लक्ष बत्तीस हजार फक्त ) |
| २१ | नांदेड | ५५५.६८ | (रुपये पाच कोटी पंचावन्न लक्ष अडूसष्ट हजार फक्त ) |
| २२ | उस्मानाबाद | १४१.०० | (रुपये एक कोटी एकेचाळीस लक्ष फक्त ) |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | अकोला | ७८.४९ | (रुपये अष्टयाहत्तर लक्ष एकोणपन्नास हजार फक्त ) |
| २४ | वाशिम | ७९.९९ | (रुपये एकोणऐंशी लक्ष नव्व्याणव हजार फक्त ) |
| २५ | अमरावती | १५६.७९ | (रुपये एक कोटी छप्पन्न लक्ष एकोणऐंशी हजार फक्त ) |
| २६ | बुलढाणा | १७४.०० | (रुपये एक कोटी चौऱ्याहत्तर लक्ष फक्त ) |
| २७ | यवतमाळ | २४२.३९ | (रुपये दोन कोटी बेचाळीस लक्ष एकोणचाळीस हजार फक्त ) |
| २८ | भंडारा | ६९.७२ | (रुपये एकोणसत्तर लक्ष बहात्तर इजार फक्त ) |
| २९ | गोंदिया | ५२.४२ | (रुपये बावन्न लक्ष बेचाळीस हजार फक्त ) |
| ३० | चंद्रपूर | ९९.०२ | (रुपये नव्व्याणव लक्ष दोन हजार फक्त ) |
| ३१ | गडचिरोली | २३०.२२ | (रुपये दोन कोटी तीस लक्ष बाबीस हजार फक्त ) |
| ३२ | वर्धा | १३६.८६ | (रुपये एक कोटी छत्तीस लक्ष शहाऐंशी हजार फक्त ) |
| ३३ | नागपूर | १९४.३१ | (रुपये एक कोटी चौऱ्यान्नव लक्ष एकतीस हजार फक्त ) |
| | एकूण | ५९६०.०० | (रुपये एकोणसाठ कोटी साठ लक्ष फक्त ) |

(म.सो.खंडारे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.